# प्र क र ण - ४ थे.

## पृथ:करण व अर्थनिर्वचन

## प्रकरण ४ थे - पृथ:करण व अर्थनिर्वचन

४.१ प्रस्तावना

४.२ प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

अ] प्रतिसादकांची माहिती.

ब] कर्मवीर मामासाहेबांची राहणी व इतर व्यक्तींचा त्यांचेवरील प्रभाव.

क] स्त्री- शिक्षण.

ड] विधवा व परित्यक्ता यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय.

इ] वर्ण व्यवस्था व अंधश्रध्दा .

ई] वसतिगृहातील आहार व व्यायाम.

प] नेतृत्व व श्रम प्रतिष्ठा.

फ] शेतक-यामध्ये जागृती.

भ] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यासाठी व्यवसाय.

म] कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या बाबत विविध समाज घटकातील प्रतिक्रिया.

४.३ मुलाखतीच्या आधारे मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

४.४ कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी सुरु केलेल्या विविध संस्थांना भेटी देवून अभ्यासकाने केलेले अर्थनिर्वचन.

४.५ ध्वनी फितीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन.

UNIVERSITY LIBRARY ...PUR

## ४.१ प्रस्तावना -

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी सामाजिक शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा चिकित्सक अभ्यास हा अभ्यासकाचा विषय आहे. मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन करण्यापूर्वी कर्मवीर मामांचे शिक्षण व त्यांनी केलेले सामाजिक कार्य पहाणे आवश्यक होते. म्हणून मागील प्रकरण ३ मध्ये कर्मवीर मामासाहेबांचे संक्षिप्त जीवन चरित्र दिलेले आहे.

माहिती मिळविण्यासाठी संशोधकाने प्रश्नावली, मुलाखती, प्रकाशित साहित्य, संस्थांना भेटी व ध्वनी फिती या साधनांचा वापर केला आहे.

## ४.२ प्रश्नावलीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन -

अभ्यासकाने अभ्यासाची उद्दिष्टे लक्षात घेऊन प्रश्नावली तयार केली. [ प्रश्नावली परिशिष्ट-२ मध्ये पहावी] कै. कर्मवीर मामासाहेबांच्या प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंधात आलेल्या १२५ व्यक्तींना अभ्यासकाने प्रश्नावल्या दिल्या. परगांवी असणा-या व्यक्तींना प्रश्नावली पोष्टाने पाठवल्या तर बार्शी शहरातील व्यक्तींना अभ्यासकाने प्रत्यक्ष भेटून प्रश्नावल्या दिल्या. कांही व्यक्तींना स्मरण पत्रे पाठवून तर कांही व्यक्तींना समक्ष भेटून अभ्यासकाने एकूण ७८ प्रश्नावल्या मिळविल्या. अभ्यासकास ६२.४% एवढा प्रतिसाद मिळाला. प्रतिसादकांचे शैक्षणिक पात्रतेनुसार खालील प्रमाणे वर्गीकरण केले आहे.

अ] प्रतिसादकांची माहिती -

कोष्टक क्रमांक-४.१.

प्रतिसादकांचे शैक्षणिक पात्रतेनुसार वर्गीकरण.

| शैक्षणिक पात्रता. | एस्.एस्.सी. पेक्षा कमी. | एस्.एस्.सी. | पदवीधर | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| प्रतिसाद संख्या. | ०२ | १५ | ५५ | ०६ | ७८ |
| शेकडा प्रतिसाद | २.५६ | १९.२३ | ७०.५१ | ७.७० | १०० |

प्रश्नावलीत मिळालेल्या प्रतिसादकांमध्ये पदवीधरांची संख्या जास्त आहे. [ ७०.५१%] पीएच्.डी. ही पदवी घेतलेल्याचे प्रमाण ७.७ टक्के आहे. एस्.एस्.सी. शिक्षण घेतलेल्यांची संख्या शेकडा १९.२३ आहे. एस्.एस्.सी. पेक्षा कमी शिक्षण झालेल्यांची संख्या शेकडा २.५६ आहे. प्रतिसादकांत पदवीधरांची संख्या सर्वात जास्त आहे.

प्रतिसादक संस्थेचा माजी विद्यार्थी आहे किंवा नाही यावरून वर्गीकरण केले आहे. तसेच प्रतिसादक संस्थेचा सदस्य व कर्मचारी आहे काय? प्रतिसादकात समाजसेवक व नागरिकांचे काम प्रमाण आहे. यावरून खाली वर्गीकरण केले आहे.

कोष्टक -४.२

प्रतिसादकांचे सेवेतील पद, संस्थेतील पद व माजी विद्यार्थी आहे किंवा नाही यावरून वर्गीकरण.

| प्रतिसादक | संस्था कर्मचारी | संस्था सदस्य | समाज सेवक | नागरिक | एकूण | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|
| माजी विद्यार्थी | २५ | ११ | ०७ | १३ | ५६ | ७१.८० |
| माजी विद्यार्थी नसलेले | १४ | ०३ | ०३ | ०२ | २२ | २८.२० |
| एकूण | ३९ | १४ | १० | १५ | ~~७६~~ ७८ | १०० |
| शेकडा प्रमाण | ५० | १७.९५ | १२.८२ | १९.२३ | १०० | |

प्रतिसाद देणाऱ्यात संस्थेचे माजी विद्यार्थी यांची संख्या जास्त आहे[७१.८०%] संस्थेचे कर्मचारी यांनीही प्रतिसाद चांगला दिला आहे [५०%] संस्थेचे सदस्य असलेल्यांचा सहभाग १७.९५% एवढा आहे. ]

ब] कर्मवीर मामासाहेबांची राहणी व इतर व्यक्तींचा प्रभाव -

या विभागात प्रतिसादकास एकूण सहा प्रश्न विचारले होते. मामासाहेबांचा व आपला प्रथम संबंध कोणत्या प्रसंगी आला? असा प्रश्न १ ला होता. आलेल्या उत्तरातून खालील गोष्टी स्पष्ट होतात.

१] बोर्डिंगमध्ये सर्वांना समान वागणूक मिळे.

२] आर्थिक स्थितीनुसार बोर्डिंगची फी आकारली जाई.

३] सेवेत घेताना त्या व्यक्तीच्या कार्यक्षमतेचा विचार केला जाई.

प्रतिसादक मामांच्या संपर्कात किती वर्षे होते याबाबतचा प्रश्न दुसरा होता.

कोष्टक क्रमांक -४. ३

कै. कर्मवीर मामासाहेबांशी प्रतिसादकांचा संबंध.

| वर्षे | प्रत्यक्ष | अप्रत्यक्ष |
|---|---|---|
| ०-५ | १० | १३ |
| ६-१० | १२ | १३ |
| ११-२० | ०५ | २० |
| २१-३० | ११ | ०३ |
| ३१-४० | ०५ | ०१ |
| ४१-५० | ०६ | ०४ |

११ ते २० वर्षापर्यंत अप्रत्यक्ष संबंध आलेल्याची संख्या जास्त आहे. ३१ ते ४० वर्षे प्रत्यक्ष संबंध आलेल्यांची संख्या ५ आहे. तर अप्रत्यक्ष संबंध आलेल्यांची संख्या फक्त १ आहे. ४१ ते ५० प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष आलेल्यांची संख्या अनुक्रमे ६ व ४ अशी आहे. प्रतिसादक कमी जास्त वर्षे मामांच्या सहवासात होते.

याच विभागातील प्रश्न ३ रा मामांच्या राहणी व व्यक्तिगत जीवनाविषयी होता. त्याचे वर्गीकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक-४.४

कै. कर्मवीर मामासाहेबांची राहणी व व्यक्तीगत जीवन.

| वर्णाक्षर | राहणी व जीवन | प्रतिसाद | शेकडा |
|---|---|---|---|
| अ | भपकेबाज | ० | ० |
| ब | जनसामान्यापासून दूर | ०३ | ३.८४ |
| क | समाजाशी समरस होऊन लढणारे | ६९ | ८८.४६ |
| ड | चिंतन करणारे | १५ | १९.२३ |

काही प्रतिसादकांनी दोन वर्णाक्षरावर खुणा केल्याने एकूण बेरीज ७८ पेक्षा जास्त येते. मामासाहेबांची राहणी व जीवन भपकेबाज होते असा एकही प्रतिसाद मिळाला नाही. जनसामान्यापासून दूर असे तीन प्रतिसादकांचे म्हणणे होते. समाजाशी समरस होऊन लढणारे असा ८८.४६ टक्के प्रतिसाद मिळाला. चिंतन करणारे होते असा १९.२३% प्रतिसाद मिळाला. मामासाहेबांचे जीवन समाजाशी समरस होऊन लढणारे होते. मामासाहेबांची राहणी अत्यंत साधी होती.

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर कोणत्या पुस्तकांचा परिणाम झाला होता. याचा शोध घेण्यासाठी प्रश्न ४ था होता. त्याचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.५

कै. कर्मवीर मामांच्या जीवनावर विविध पुस्तकांचा झालेला परिणाम.

| अ.नं. | पुस्तकाचे नांव | महत्वांशानुसार क्रमांक | | | | | अनुत्तरित | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | ५ | | |
| १. | ज्ञानेश्वरी | ०१ | १९ | २६ | १८ | १३ | ०१ | ७८ |
| २. | तुकारामाची गाथा | ५४ | १० | ०६ | ०७ | ०१ | – | ७८ |
| ३. | म. फुले चरित्र | १२ | २५ | २५ | १५ | ०१ | – | ७८ |
| ४. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र | ०१ | ०६ | ०२ | १२ | ५६ | ०१ | ७८ |
| ५. | शिवाजी महाराज | १० | १८ | १९ | २५ | ०६ | – | ७८ |
| | यांचे वरील पुस्तके एकूण | ७८ | ७८ | ७८ | ७७ | ७७ | ०२ | ३९० |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा शेकडा प्रतिसाद काढताना आकडेमोड करावी, लागेल.

आकडे मोड – लिकर्ट पध्दतीने शेकडा प्रतिसाद काढता येईल. १ ते ५ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण देवू.

प्रथम निवड – ५ गुण.

द्वितीय निवड – ४ गुण.

तृतिय निवड – ३ गुण.

चौथी निवड – २ गुण.

पाचवी निवड – १ गुण.

एकूण प्रतिसाद संख्या ७८ असल्याने एकूण गुण.

= ७८×५+ ७८×४ + ७८×३ + ७८×२ – ७८×१

= ७८ [५+४+३+२+१]

= ७८×१५

= ११७०

१] ज्ञानेश्वरी या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = १x५ + १९x४ + २६x३ + १८x२ + १३x१

= ५+७६+७८+३६+१३

= २०८.

शेकडा गुण = $\frac{२०८}{११७०} \times \frac{१००}{१}$ = १७.७८%

२] " तुकारामाची गाथा " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ५४x५ + १०x४ + ६x३ + ७x२ + १x१

= २७०+४०+१८+१४+१

= ३४३

शेकडा गुण= $\frac{३४३}{११७०} \times \frac{१००}{१}$ = २९.३१%

३]"महात्मा फुले चरित्र" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = १२x५ + २५x४ + २५x३ + १५x२ + १x१

= ६०+१००+७५+३०+१

= २६६

शेकडा गुण= $\frac{२६६}{११७०} \times \frac{१००}{१}$ = २२.७३%

४] "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे चरित्र"या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = १x५ + ६x४ + २x३ + १२x२ + ५६x१

= ५+२४+०६+२४+५६

= ११५

शेकडा गुण= $\frac{११५}{११७०} \times \frac{१००}{१}$ ९.८३%

५] " शिवाजी महाराज यांचे वरील पुस्तके" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण.

एकूण गुण = १०×५ + १८×४ + १९×३ + २५×२ + ६×१

= ५० + ७२ + ५७ + ५० + ६

= २३५

शेकडा गुण = २३५/११७० × १००/१ = २०.९%

======

१ ते ५ उत्तराचे शेकडा गुण काढले. त्यांची बेरीज १०० एवढी येत नाही. कारण दोन पर्याय अनुत्तरित आहेत.

तुकारामाची गाथा या पुस्तकाचा कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर सर्वात जास्त परिणाम दिसून येतो. [शेकडा २९.३१] त्यानंतर महात्मा फुले यांच्या चरित्राचा परिणाम दिसतो. [ शेकडा २२.७३] शिवाजी महाराजावरील पुस्तके यास शेकडा २०.९ इतका प्रतिसाद मिळाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चरित्राचा सर्वात कमी म्हणजे ९.८% प्रतिसाद मिळाला.

तुकारामाची गाथा व महात्मा फुले यांचे जीवन चरित्र यांचा कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर विशेष परिणाम झालेला आहे.

कै. कर्मवीर मामांच्या जीवनावर कोणत्या व्यक्तींचा परिणाम झाला होता हे पहाण्यासाठी "ब" विभागात प्रश्न ५ वा होता.

कोष्टक क्रमांक ४.६

कै. कर्मवीर मामांच्या जीवनावर व्यक्तींचा झालेला परिणाम.

| अ. नं. | व्यक्ती | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | शिवाजी महाराज | २४ | ११ | ३३ | १० | ७८ |
| २. | भाऊराव पाटील | २६ | ३८ | ०९ | ०५ | ७८ |
| ३. | महात्मा गांधी | ०० | ०६ | २० | ५२ | ७८ |
| ४. | महात्मा जोतीबा फुले | २८ | २३ | १६ | ११ | ७८ |
| | एकूण | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ३१२ |

आकडे मोड-

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायांचा शेकडा प्रतिसाद काढतांना आकडेमोड करावी लागले.

१ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण देवू.

| | | | |
|---|---|---|---|
| प्रथम निवड | - | ४ | गुण |
| द्वितीय निवड | - | ३ | गुण |
| तृतीय निवड | - | २ | गुण |
| चौथी निवड | - | १ | गुण |

एकूण गुण = ७८×४ + ७८×३ + ७८×२ + ७८×१

= ७८× [ ४ + ३ + २ + १ ]

= ७८×१०

= ७८०

१] " शिवाजी महाराज " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = २४×४ + ११×३ + ३३×२ + १०×१

= ९६ + ३३ + ६६ + १०

= २०५

शेकडा गुण = $\frac{२०५}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २६.२%

२] " भाऊराव पाटील " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = २६×४ + ३८×३ + ९×२ + ५×१

= १०४ + ११४ + १८ + ५

= २४१.

शेकडा गुण = $\frac{२४१}{७८०} \times \frac{१००}{१}$ = ३०.९%

३] " महात्मा गांधी " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ००×४ + ६×३ + २०×२ + ५२×१

= ० + १८ + ४० + ५२

= ११०

शेकडा गुण = $\frac{११०}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १४.१०%

४] " महात्मा जोतीबा फुले " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = २८×४ + २३×३ + १६×२ + ११×१

= ११२ + ६९ + ३२ + ११

= २२४

शेकडा गुण = $\frac{२२४}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २८.७१%

कै. कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांच्या जीवनावर सर्वात जास्त भाऊराव पाटील यांचा प्रभाव दिसून येतो [३०.९%] त्यानंतर महात्मा जोतीबा फुले यांचा परिणाम दिसून येतो [ २८.७%] शिवाजी महाराज [२६.२%] तर महात्मा गांधी [१४.१%] असा परिणाम दिसून येतो.

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी समाजाचे जवळून निरिक्षण केलेले होते. समाजातील कोणत्या अडचणी मामासाहेबांना जाणवल्या होत्या याबाबत प्रश्न क्रमांक ६ वा विचारला होता. त्याचे वर्गिकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.७

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांना समाजातील जाणवलेल्या अडचणी.

| अ.नं. | जाणवलेल्या अडचणी | महत्वाशानुसार क्रमांक | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | स्त्री-शिक्षणाचा अभाव | ०९ | १८ | ३९ | १२ | ७८ |
| २. | मुलांची शिक्षण घेताना राहण्याजेवण्याची गैरसोय | ५६ | ०९ | ०६ | ०७ | ७८ |
| ३. | समाजातील अंधश्रध्दा | ०४ | २८ | १९ | २७ | ७८ |
| ४. | आर्थिक स्थिती | ०९ | २३ | १४ | ३२ | ७८ |
| | एकूण | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ३१२ |

आकडे- मोड -

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयास सांगितल्यामुळे प्रत्येक पर्यायाचा शेकडा प्रतिसाद काढताना आकडे मोड करावी लागेल.

१ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण देवू

| | | |
|---|---|---|
| प्रथम निवड | = | ४ |
| द्वितीय निवड | = | ३ |
| तृतीय निवड | = | २ |
| चौथी निवड | = | १ |

एकूण प्रतिसाद संख्या ७८ असल्याने एकूण गुण

= ७८x४ + ७८x३ + ७८x२ + ७८x१

= ७८ [ ४ + ३ + २ + १ ]

= ७८ [१०]

= ७८०

१] " स्त्री- शिक्षणाचा अभाव " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ९x४ + १८x३ + ३९x२ + १२x१

= ३६ + ५४ + ७८ + १२

= १८०

शेकडा गुण = $\frac{१८०}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २३.१%

२] "मुलांची शिक्षण घेतांना राहण्याजेवणाची गैरसोय " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ५६x४ + ९x३ + ६x२ + ७x१

= २२४ + २७ + १२ + ७

= २७०

शेकडा गुण = $\frac{२७०}{७८०} \times \frac{१००}{१}$ = ३४.६%

३] " समाजातील अंधश्रध्दा" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण $= \text{४}\times\text{४} + \text{२८}\times\text{३} + \text{१९}\times\text{२} + \text{२७}\times\text{१}$

$= \text{१६} + \text{८४} + \text{३८} + \text{२७}$

$= \text{१६५}$

शेकडा गुण $= \frac{\text{१६५}}{\text{७८०}} \times \frac{\text{१००}}{\text{१}} = \text{२१.२\%}$

४] " आर्थिक स्थिती " या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण $= \text{९}\times\text{४} + \text{२३}\times\text{३} + \text{१४}\times\text{२} + \text{३२}\times\text{१}$

$= \text{३६} + \text{६९} + \text{२८} + \text{३२}$

$= \text{१६५}$

शेकडा गुण $= \text{१६५} \times \text{१००} = \text{२१.२\%}$

ग्रामीण भागातील मुलांची शिक्षण घेताना राहण्याजेवण्याची गैरसोय हीच प्रमुख अडचण कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांना जाणवली [ ३४.६%] स्त्री शिक्षणाचा अभाव ही दुसरी अडचण जाणवली [ २३.१%] त्या खालोखाल पालकांची आर्थिक स्थिती व अंधश्रध्दा या अडचणी होत्या. [२१.२%] होत्या.

क] <u>स्त्री-शिक्षण.</u>

प्रश्नावलीतील "क" विभागात स्त्री शिक्षणाबाबत अभ्यासकाने एकूण चार प्रश्न विचारले होते. बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत कोणत्या अडचणी होत्या हा पहिला प्रश्न होता. त्याचे वर्गिकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक - ४.८

" बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत अडचणी "

| अ. नं. | समस्या | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | शाळेची गैरसोय | १८ | २७ | २८ | ०५ | ७८ |
| २. | राहण्याजेवण्याची गैरसोय | ४६ | २० | १० | ०२ | ७८ |
| ३. | पालकांचा दृष्टीकोन | ०२ | २२ | १८ | २६ | ७८ |
| ४. | आर्थिक स्थिती | १२ | ०९ | २२ | ३५ | ७८ |
| | एकूण | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ३१२ |

आकडे मोड -

१ ते ४ क्रमांक असल्याने १ ते ४ गुण खालील प्रमाणे दिले.

प्रथम निवड = ४ गुण  एकूण गुण = ७८०

द्वितीय निवड= ३ गुण

तृतीय निवड = २ गुण

चौथी निवड = १ गुण

१] शाळेची गैरसोय-

= १८x४ + २७x३ + २८x२ + ५x१

= ७२ + ८१ + ५६ + ५

= २१४

शे. गुण = $\frac{२१४}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २७.४४%

२. मुलांची राहण्याजेवणाची गैरसोय-

= ४६×४ + २०×३ + १०×२ + २×१

= १८४ + ६० + २० + ०२

= २६६.

शेकडा गुण = $\frac{२६६}{७८०} \times \frac{१००}{१}$ = ३४.१०%

३. पालकांचा दृष्टीकोन.

= २×४ + २२×३ + १८×२ + ३६×१

= ०८ + ६६ + ३६ + ३६

= १४६

शेकडा गुण = $\frac{१४६}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १८.७%

४. आर्थिक स्थिती -

= १२×४ + ०९×३ + २२×२ + ३५×१

= ४८ + २७ + ४४ + ३५

= १५४

शेकडा गुण = $\frac{१५४}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १९.७४%

बहुजन समाजाच्या शिक्षणाबाबत मुलांच्या राहण्या जेवण्याची गैरसोय हीच अडचण प्रामुख्याने मामांना जाणवली [ ३४.१०%] शाळेची गैरसोय [२७.४४%] पालकांचा दृष्टीकोन [ १८.७%] व आर्थिक स्थिती [१९.७४] याही शिक्षणाबाबतच्या अडचणी आहेत असे दिसून आले.

प्रश्नावलीतील "क" विभागातील प्रश्न दुसरा स्त्री- शिक्षणाबाबतच्या कोणत्या अडचणी मामांना जाणवल्या होत्या असा होता. मामासाहेबांना

जाणवलेल्या अडचणींचे वर्गिकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक – ४.९

स्त्री शिक्षणाबाबत के. कर्मवीर मामासाहेबांना जाणवलेल्या अडचणी.

| अ. नं. | जाणवलेल्या अडचणी | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | मुलींची राहण्या जेवणाची गैरसोय | ५७ | १४ | ०३ | ०४ | ७८ |
| २. | शाळेची गैरसोय | १० | २४ | ३८ | ०६ | ७८ |
| ३. | पालकांचा दृष्टीकोन | ०७ | ३० | १७ | २४ | ७८ |
| ४. | आर्थिक स्थिती | ०४ | १० | २० | ४४ | ७८ |
| | एकूण | ७८ | ७८ | ७८ | ७८ | |

आकडे मोड –

क्रमांक १ ते ४ आहेत. म्हणून खालील प्रमाणे गुण दिलेले आहेत.

प्रथम निवड – ४ गुण.

द्वितीय निवड – ३ गुण.

तृतीय निवड – २ गुण.

चौथी निवड – १ गुण.

१] मुलींची राहण्या जेवणाची गैरसोय.

= ५७×४ + १४×३ + ०३×२ + ०४×१

= २२८ + ४२ + ०६ + ४

= २८०

शे. गुण. = $\frac{२८०}{७८०} \times \frac{१००}{१}$ = ३५.९%

२] शाळेची गैरसोय -

$$१\times४ + २४\times३ + ३८\times२ + ७\times१$$

$$= ३६ + ७२ + ७६ + ७$$

$$= १९०$$

$$श्रे.\ गुण = \frac{१९०}{७८०} \times \frac{१००}{१} = २४.३५\%$$

३] पालकांचा दृष्टीकोन -

$$= ८\times४ + ३०\times३ + १७\times२ + २४\times१$$

$$= ३२ + ९० + ३४ + २४$$

$$= १८०$$

$$श्रे.\ गुण = \frac{१८०}{७८०} \times \frac{१००}{१} = २३.०८\%$$

४] आर्थिक स्थिती -

$$= ४\times४ + १०\times३ + २०\times२ + ४४\times१$$

$$= १६ + ३० + ४० + ४४$$

$$= १३०$$

$$श्रे.\ गुण = \frac{१३०}{७८०} \times \frac{१००}{१} = १६.६७\%$$

मामासाहेबांना स्त्री शिक्षणाबाबत मुलींची राहण्या जेवण्याची गैरसोय ही प्रमुख अडचण जाणवली [ ३५.९%] तसेच शाळेची गैरसोय [ २४.३५%] पालकांचा दृष्टकोन [ २३.०८%] व आर्थिक स्थिती [ १६.६७%] ह्याही अडचणी मामासाहेबांना जाणवल्या होत्या.

स्त्री- शिक्षणासाठी कै. कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी कोणते प्रयत्न केले? हा "क" विभागातील प्रश्न तिसरा होता. या प्रश्नांच्या उत्तराचे वर्गीकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्र. ४. १०

कै. कर्मवीर मामांनी स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न.

| वर्णाक्षर | स्त्री शिक्षणासाठी केलेले प्रयत्न | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ] | शिक्षण घेणा-या मुलींची राहण्या जेवणाची सोय केली. | ७८ | १०० |
| ब] | मोफत शिक्षण दिले. | ०६ | ७. ७ |
| क] | प्रौढ स्त्रियांसाठी वर्ग चालविले | ०४ | ५. १२ |
| ड] | शैक्षणिक साहित्य पुरविले | ०४ | ५. १२ |

[ टिप - काही प्रतिसादकांनी एकापेक्षा जास्त वर्णाक्षरावर खूण केल्याने शे. प्रतिसाद १०० पेक्षा जास्त येतो]

कर्मवीर मामांनी शिक्षण घेणा-या मुलींची राहण्या जेवणाची सोय केली [१००%]. पुढील प्रयत्नास अल्प प्रतिसाद मिळाला, मोफत शिक्षण दिले [७. ७%], प्रौढ स्त्रियासाठी वर्ग चालविले [५. १२%], शैक्षणिक साहित्य पुरविले [५. १२%].

"क" विभागातील प्रश्न चौथा मामांचे स्त्री शिक्षणाविषयी मत जाणण्यासाठी होता. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक= ४. ११

स्त्री शिक्षणाबाबत कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची मते.

| वर्णाक्षर | मत | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ] | शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात पुरुषाप्रमाणे काम करावे. | ७७ | ९८. ७१ |
| ब] | स्त्रियांनी शिकू नये. | - | - |
| क] | शिक्षण घेऊन घरकाम करावे | ०८ | १०. २५ |
| ड] | जुजबी शिक्षण घ्यावे | - | - |

ड] विधवा व परित्यक्ता यांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय या विभागात एकूण तीन प्रश्न आहेत. पहिला प्रश्न मामांचा विधवा व परित्यक्ता यांच्या बाबत दृष्टीकोन कसा होता या संदर्भात आहे. त्याचे पृथ:करण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.१२

विधवा परित्यक्ता याबाबतचा मामांचा दृष्टीकोन .

| वर्णाक्षर | दृष्टीकोन | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | अलिप्त | ०० | ०० |
| ब. | नोकरी देवून स्वत:च्या पायावर उभे करणे. | ६१ | ८८.४६ |
| क. | तिरस्कार युक्त | ०० | ०० |
| ड. | सहानुभूतीपूर्व क | २१ | २६.९२ |

[ टिप- काही प्रतिसादकांनी दोन वर्णाक्षरावर खुणा केल्या आहेत. ]

मामांचा दृष्टीकोन विधवा व परित्यक्ता यांच्या बाबत अलिप्त व तिरस्कार युक्त [००%] अजिबात नव्हता. त्यांना नोकरी देवून स्वत:च्या पायावर उभे केले पाहिजे [ ८८.४६%] असेच मामाचे मत होते. विधवा व परित्यक्ता यांच्या बाबत मामांच्या मनात सहानुभूति होती [२६.९२%]

प्रश्न दुसरा विधवा विवाहाबाबतचा होता. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.१३

विधवा विवाहाबाबत मामांचे मत.

| वर्णाक्षर | मामासाहेबांचे मत | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | मुले असतील तर विवाह न करता त्यांचेच पालन पोषण करावे. | ७४ | ९४.८७ |
| ब. | विवाहच करावा. | ११ | १४.१० |
| क. | विवाह करु नये. | – | ०० |

[टिप- काही प्रतिसादकांनी दोन वर्णाक्षरावर खुणा केलेल्या आहेत]

मुले असतील तर त्यांचाच सांभाळ करावा व विवाह करु नये असे मामांचे मत होते. असा प्रतिसाद अल्प आहे. [१४.१०%] विवाह करु नये असे मामांचे मत नव्हते. [००%]

प्रश्न तिसरा विधवा, परित्यक्ता व विधुर यांच्या मुलांचे शिक्षण याबाबतचा आहे. यांच्या मुलांसाठी मामांनी कोणते प्रयत्न केले? या प्रश्नाचे पृथःकरण खालील प्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ४.१४

विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या मुलांची शिक्षणाची सोय

| वर्णाक्षर | शिक्षणाची सोय | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | त्यांना मोफत शिक्षण दिले. | ५ | ६.४ |
| ब. | विधवा, विधुर व परित्यक्ता यांना काम दिले. त्यांची त्यांच्या मुलांची राहण्या जेवण्याची सोय केली व त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली. | ७७ | ९८.७ |
| क. | मुलांना शै. साहित्य पुरविले | ०१ | १.२८ |

[टिप- काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरावर खुणा केल्या आहेत.]

मोफत शिक्षण दिले या विधानात अल्प प्रतिसाद मिळाला आहे [६.४%] याचा अर्थ फुकट सर्व शिक्षणाच्या सोयी कराव्यात असे मामांचे मत नव्हते. विधवा, विधुर व परित्यक्ता यांना काम देवून त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय करावी असेच मामासाहेबांचे मत होते [ १८.७%] मामांनी मोफत शैक्षणिक साहित्य देखील पुरविले नाही [१.२८%] असे दिसून येते.

याच विभागात प्रश्न चौथा मुक्त प्रश्न विचारला होता. मामांच्या विविध ठिकाणच्या वसतिगृहात निरनिराळे कामे करण्यास असणारे विधवा विधुर व परित्यक्ता यांची नांवे विचारली होती. ७८ प्रतिसादकांच्या उत्तरातून ३० विविध नांवे मिळाली. काही नांवे एकापेक्षा अधिक प्रतिसादकांच्या उत्तरात आहेत. विविध ठिकाणच्या वसतिगृहात कामे देण्याचा प्रयोग चालू होता असे दिसते.

याच विभागात प्रश्न पाचवाही मुक्त प्रश्नच विचारला होता. ज्यांच्या आई किंवा वडिलांने वसतिगृहात कामे केले. त्यामुळे ज्यांच्या शिक्षणाची सोय झाली. अशा काही लोकांची नांवे व पत्ते या प्रश्नात विचारले होते. ७८ प्रश्नावलीतून ३४ नांवे मिळाली. काहीचे नांवे एकापेक्षा अधिक प्रतिसादकांच्या उत्तरात आलेली आहेत. काही विद्यार्थी सरकार दरबारी चांगल्या हुद्दयावर आहेत असे दिसून आले.

इ] <u>वर्ण व्यवस्था व अंधश्रध्दा -</u>

या विभागात अभ्यासकाने प्रतिसादकास तीन प्रश्न दिले होते. प्रश्न वर्ण व्यवस्था व अंधश्रध्दा याविषयी होते. प्रश्न पहिल्याचे पृथःकरण खालील प्रमाणे :

कोष्टक क्रमांक ४.१५
वर्ण व्यवस्था याबाबत मामासाहेबांचे मत.

| वर्णाक्षर | मत | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | वर्ण व्यवस्था असावी | १ | १.२८ |
| ब. | वर्ण व्यवस्था नसावी | ७७ | ९८.७२ |
| | एकूण. | ७८ | १०० |

वर्ण व्यवस्था नसावी असे मामासाहेबांचे मत होते असाच प्रतिसाद [९८.७२%] जास्त मिळाला आहे. वर्ण व्यवस्था असावी असे मामांचे मत होते. असा प्रतिसाद फारच अल्प [१.२८%] आहे. यावरून मामासाहेबांना वर्ण व्यवस्था मान्य नव्हती असे दिसते.

याच विभागातील प्रश्न तिसरा वर्ण व्यवस्था नष्ट करण्यासाठी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी कोणते प्रयत्न केले ? ही माहिती मिळविण्यासाठी होता. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.१६

वर्ण व्यवस्था नष्ट करण्यासाठी केलेले प्रयत्न

| अ. नं. | प्रयत्न | प्रतिसाद. | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | सर्वांना एकाच पंगतीत जेवण असे. | ७८ | १०० |
| २. | वाटपी सर्व जाती जमातीतील होते | ७० | ८९.७४ |
| ३. | स्वयंपाक कामातही सर्व जातीजमातीतील स्त्रिया होत्या. | ७३ | ९३.५८ |
| ४. | वसतिगृहात सर्वांना प्रवेश होता. | ७४ | ९४.८७ |
| ५. | आंतरजातीय विवाह लावून दिले. | १८ | २३.०७ |

कै. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी वर्णव्यवस्था नष्ट करण्यासाठी वसतिगृहात सर्वांना एकाच पंगतीत जेवण देण्याची व्यवस्था केली होती [ १००%] तसेच पुढीलही प्रयत्न वसतिगृहात केले होते. वाढपी सर्व जाती-जमातीतील होते [ ८९.७४% ] स्वयंपाक कामातही सर्व जाती जमातीतील स्त्रिया होत्या. [ ९३.५८%] वसतिगृहात सर्वांना प्रवेश देण्याची व्यवस्था होती [ ९४.८७%] आंतरजातीय विवाह लावून देण्याचा प्रयत्न केला. [ २३.०७] टक्के.

याच विभागातील प्रश्न तिसरा अंधश्रध्दा निर्मूलनासाठी मामांनी कोणते प्रयत्न केले या विषयी होता. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे .

कोष्टक क्रमांक - ४.१७

अंधश्रध्दा निर्मूलनासाठी मामांनी केलेले प्रयत्न.

| अ.नं. | अंधश्रध्दा निर्मूलनासाठी केलेले प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | भाषणातून अंधश्रध्देवर प्रहार केले. | ७३ | ९३.५८ |
| २. | हुंडाबंदीच्या शपथा घेण्यास लावले. | ६१ | ७८.२० |
| ३. | विवाह कमी खर्चात लावले. | ६८ | ८७.१९ |
| ४. | पुजा अर्चा यावरील खर्च कमी करण्यास सांगितले. | ५७ | ७४.३५ |
| ५. | प्रदर्शने भरवली | ०७ | ८.९७ |

मामा अंधश्रध्दा निर्मूलनासाठी पुढील प्रयत्न करीत. भाषणातून अंधश्रध्देवर प्रहार केले [ ९३.५७%]. हुंडा बंदीच्या शपथा घेण्यास लावत [ ७८.२०%]. विवाह कमी खर्चात लावले [८७.१९%]. पुजा अर्चा यावरील खर्च कमी करण्यास सांगितले [ ७४.३५%]. प्रदर्शने भरवली या प्रयत्नास अल्प प्रतिसाद मिळाला [८.९७%].

ई ] वसतिगृहातील आहार व व्यायाम.

"ई" या विभागात वसतिगृहातील मुलांचा आहार व व्यायाम कसा असावा असे मामांचे मत होते. याबाबत माहिती मिळविण्यासाठी एकूण पाच प्रश्न होते. त्यातील प्रश्न पहिल्याचे पृथःकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक- ४. १८

वसतिगृहातील मुलांचा आहार.

| वर्णाक्षर | वसतिगृहातील मुलांचा आहार | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | साधा पण पौष्टिक | ७८ | १०० |
| ब. | चमचमीत | ००४ | ०० |
| क. | पौष्टिक | ०१ | १. २८ |
| ड] | पचनास हलका | ०१ | १. २८ |

[ टिप- काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरासमोर खुणा केलेल्या आहेत. ]

वसतिगृहातील मुलांच्या आहाराबाबत खालील प्रमाणे प्रतिसाद मिळाला आहे.

साधा पण पौष्टिक आहार [१००%] चमचमीत आहार [००%] पौष्टिक आहार [१. २८%] पचनास हलका [१. २८%] वसतिगृहात साधा पण पौष्टिक आहारच दिला जात असे.

कोष्टक क्र. ४.१९

वसतिगृहातील नाष्टा.

| वर्णाक्षर | वसतिगृहातील नाष्टा. | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | तूप-चपाती | ०० | ०० |
| ब. | पिठले-भाकरी | ७८ | १००% |
| क. | दूध - अंडी | ०० | ०० |
| ड. | शिरा - पुरी | ०० | ०० |

पिठले भाकरीस १००% प्रतिसाद मिळाला आहे. तूप चपाती, दूध- अंडी व शिरा-पुरी या पर्यायास ००% प्रतिसाद मिळाला आहे. वसतिगृहात पिठले पिठलेभाकरीचा नाष्टा दिला जात असे.

याच विभागात सर्वांसाठी मामासाहेब जगदाळे कोणत्या व्यायामाची अपेक्षा करीत ही माहिती मिळविण्यासाठी प्रश्न तीसरा विचारला होता.

कोष्टक क्र. ४.२०

वसतिगृहातील व्यायाम प्रकार.

| वर्णाक्षर | व्यायाम प्रकार | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | दंड बैठका | २१ | २६.९२ |
| ब. | पळणे - धावणे | ७० | ८९.७४ |
| क. | कुस्ती | १८ | २३.०७ |
| ड. | घोड्यावर बसणे | ०१ | १.२८ |

[टीप- काही प्रतिसादकाने एकापेक्षा अधिक वर्णाक्षरासमोर खूण केली आहे]

दंड बैठका या व्यायाम प्रकारास शे. २६.९२ इतका प्रतिसाद मिळाला. धावणे या व्यायाम प्रकारास ८२.७४% इतका प्रतिसाद मिळाला. कुस्ती या प्रकारास २३.०७% इतका प्रतिसाद मिळाला. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे धावणे हाच उत्तम व्यायाम प्रकार आहे. असे सांगत व वसतिगृहातील सर्व मुलांसाठी धावणे याच व्यायाम प्रकाराची निवड केलेली होती. घोडयावर बसणे या व्यायाम प्रकारास अल्प म्हणजे १.२८% इतका प्रतिसाद मिळाला.

ई विभागातील प्रश्न चौथा व्यायाम व आहार या विषयी होता. त्याचे पृथःकरण खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक ४.२१

वसतिगृहात आहार व व्यायामाची सांगड.

| वर्णाक्षर | वसतिगृहातील आहार व व्यायाम | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | व्यायाम करणा-यांना जास्त नाष्टा मिळे | १८ | २३.०७ |
| ब. | फक्त व्यायाम करणा-यानांच नाष्टा मिळे | ४५ | ५६.४१ |
| क. | सर्वांना नाष्टा मिळे. | १९ | २४.३५ |

[टिप - काही प्रतिसादकांनी एकापेक्षा जास्त वर्णाक्षरावर खुणा केलेल्या आहेत.]

फक्त व्यायाम करणारांस नाष्टा मिळे या उत्तरास ५६.४१% इतका प्रतिसाद मिळाला आहे. व्यायाम करणारास जास्त नाष्टा मिळे या उत्तरास २३.०७% इतका प्रतिसाद मिळाला. सर्वांना नाष्टा मिळे या उत्तरास २४.३५% इतका प्रतिसाद मिळाला आहे.

कर्मवीर मामासाहेबांच्या वसतिगृहात फक्त व्यायाम करणा-यांनाच नाष्टा मिळत असे हे महत्वाचे आहे.

याच विभागात कर्मवीर डॉ. मामासाहेबांना कोणकोणते व्यायाम प्रकार आवडत याबाबतचा प्रश्न पाचवा विचारलेला होता. या प्रश्नाचे पृथःकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक - ४.२२

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांचे आवडते व्यायाम प्रकार.

| अ. नं. | व्यायाम प्रकार | महत्वांशानुसार क्रमांक | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | टेनिस | ० | ४ | ३ | ७१ | ७८ |
| २. | कुस्ती | १५ | १८ | ४३ | ०२ | ७८ |
| ३. | धावणे | ५३ | १६ | ०५ | ०४ | ७८ |
| ४. | पोहणे. | १० | ४० | २७ | ०१ | ७८ |
| | | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ३१२ |

महत्वांशानुसार अनुक्रमांक द्यावयाचा असल्याने प्रत्येक पर्यायाचा शेकडा प्रतिसाद काढताना आकडेमोड करावी लागेल.

१ ते ४ क्रमांक असल्याने खालील प्रमाणे गुण देवू.

प्रथम निवड - ४ गुण.

द्वितीय निवड - ३ गुण.

तृतीय निवड - २ गुण.

चौथी बिवड - १ गुण.

एकूण प्रतिसाद संख्या ७८ असल्याने एकूण गुण.

एकूण गुण = ७८×४ + ७८×३ + ७८×२ + ७८×१

= ७८ [ ४ + ३ + २ + १ ]

= ७८×१०

= ७८०

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१]"टेनिस"या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ०x४ + ४x३ + ३x२ + ७१

= ० + १२ + ६ + ७१

= ८९

शेकडा गुण - ८९/७८० x १००/१ = ११.४१%

२]"कुस्ती"या उत्तराचे एकूण गुण शेकडा गुण काढू.

एकूण गुण = १५x४ + १८x३ + ४३x२ + २x१

= ६० + ५४ + ८६ + २

= २०२

शेकडा गुण = २०२/७८० x १००/१ = २५.९%

३] "धावणे" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गंण = ५३x४ + १६x३ + ५x२ + ४x१

= २१२ + ४८ + १० + ०४

= २७४

शेकडा गुण = २७४/७८० x १००/१ = ३५.१३%

४] " पोहणे" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = १०x४ + ४०x३ + २७x२ + १x१

= ४० + १२० + ५४ + १

= २१५

शेकडा गुण = २१५/७८० x १००/१ = २७.५६%

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांना धावणे हा व्यायाम प्रकार आवडत असे [ ३५. १३%].त्यानंतर पोहणे [२७. ५६%], कुस्ती [२५. ९%]हेही व्यायाम प्रकार आवडत असत. टेनिस हा व्यायाम प्रकार मामांना आवडत नसे [११. ४१%].

प - नेतृत्व व श्रमप्रतिष्ठा.

"प" विभागात श्रम करण्याची वृत्ती व नेतृत्व गुणात वाढ यासाठी मामासाहेब जगदाळे कोणते प्रयत्न करीत असत याबाबतचे चार प्रश्न या विभागात आहेत.

प्रश्न पहिल्या मध्ये मुलामध्ये समाधीटपणा येण्यासाठी मामासाहेब कोणते प्रयत्न करीत होते असा आहे. या प्रश्नाचे पृथःकरण खालीलप्रमाणे आहे.

कोष्टक क्रमांक -४. २२ (अ)

मुलांत समाधीटपणा येण्यासाठी केलेले प्रयत्न.

| वर्गीकरण | प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | आठवड्याच्या सभेत प्रत्येकाला भाग घेण्यास सांगत | ७५ | ९६. १५ |
| ब. | रेडिओवरील भाषणे ऐकवत | २७ | ३४. ६१ |
| क. | टेप ऐकवत | ०१ | १. २८ |

आठवड्याच्या सभेत प्रत्येकाला भाग घेण्यास सांगत या प्रयत्नाला ९६. १५% प्रतिसाद मिळाला आहे. रेडिओवरील भाषणे ऐकवत या प्रयत्नास ३४. ६१% प्रतिसाद मिळाला आहे. तर टेप ऐकवत या प्रयत्नास अत्यंत अल्प प्रतिसाद मिळाला आहे. [ १. २८%]

मुलात समाधीटपणा येण्यासाठी आठवड्याच्या सभेला अत्यंत महत्वाचे स्थान दिसून येते.

याच विभागातील प्रश्न दुसरा नेतृत्व गुण वाढीसाठी केलेल्या प्रयत्नाबाबत होता. त्या प्रश्नाचे पृथःकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४. २३

नेतृत्व गुणांची वाढ होण्यासाठी प्रयत्न .

| वर्णाक्षर | प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | मुलांचे मंत्रिमंडळ असे | ६९ | ८८.४६ |
| ब. | चुकणारास शिक्षा असे | १२ | १५.३८ |
| क. | नेत्यांची भाषणे ऐकवत | १२ | १५.३८ |

नेतृत्व गुणांची वाढ होण्यासाठी वसतिगृहातील मंत्रिमंडळ अत्यंत उपयोगी ठरत असे असे दिसते. या प्रयत्नास ८८.४६% मिळाला. चुकणारास शिक्षा व नेत्यांची भाषणे ऐकविणे या दोन्ही प्रयत्नास १५.३८% प्रतिसाद मिळाला.

"प" विभागातील प्रश्न तिसरा श्रमाची आवड याबाबत होता त्या प्रश्नाचे पृथःकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक- ४.२४

श्रमाची आवड निर्माण व्हावी म्हणून केलेले प्रयत्न.

| वर्णाक्षर | प्रयत्न | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | जेवणापूर्वी एक तास काम | ६३ | ८०.७६ |
| ब. | उन्हाळ्याच्या सुट्टीत काम देवून आर्थिक मोबदला दिला जाई. | ६२ | ७९.४८ |
| क. | शेतीवरील काम देत असत. | ६४ | ८२.०५ |
| ड. | विहिरी विद्यार्थ्यांच्या मदतीने खोदल्या | ६८ | ८७.१७ |
| इ. | श्रम प्रतिष्ठेवर व्याख्याने दिली. | २४ | ३०.७६ |

श्रम प्रतिष्ठेवर व्याख्याने याच प्रयत्नास कमी [३०.७६%] प्रतिसाद मिळाला. बाकी चार प्रयत्नास प्रतिसाद उत्तमच मिळाला आहे. जेवण्यापूर्वी एक तास काम [८०.७६%], उन्हाळ्याच्या सुट्टीत काम देवून आर्थिक मोबदला दिला जाई [७९.४८%], शेतीवरील काम देत असत [८२.०५%]. विहिरी विद्यार्थ्यांच्या मदतीने खोदल्या या प्रयत्नास सर्वात जास्त प्रतिसाद मिळाला [८७.१७%].

याच विभागत प्रश्न चौथा फी माफी बाबतचा विचारला होता. त्याचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक - ४.२५

फी माफीची सवलत कोणास द्यावी.

| वर्णाक्षर | मत | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | हुषार विद्यार्थी | १८ | २३.०७ |
| ब. | समाज सेवा करणारा | ३८ | ४८.७१ |
| क. | मंद बुध्दीचा | ०१ | १.२८ |
| ड. | आर्थिक दृष्टया गरीब | ४८ | ६१.५८ |

कर्मवीर मामासाहेब जगदाळे वसतिगृहातील सर्व विद्यार्थ्यांकडून समान फी घेत नसत. आर्थिक दृष्टया गरीब विद्यार्थ्यांना फी मध्ये सवलत देत असत [६१.५८%]. समाजसेवा करणारा विद्यार्थी असेल तर त्यालाही सवलत देण्याचे मामासाहेबांचे धोरण होते [४८.७१%]. हुषार विद्यार्थ्यांना सवलत द्यावी असा [२३.०७%] एवढा प्रतिसाद मिळाला आहे.

फ ] शेतक-यामध्ये जागृती.

प्रश्नावलीच्या "फ" विभागात एकूण पाच प्रश्न आहेत. शेतक-यात जागृती होण्यासाठी कर्मवीर मामासाहेबांनी कोणकोणते प्रयत्न केले याबाबतची माहिती मिळविण्यासाठी हे प्रश्न आहेत. त्यातील पहिल्या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.२६

शेतक-याच्या मालाची विक्री होत असतांना जाणवलेल्या वाईट गोष्टी.

| वर्णाक्षर | वाईट बाबी | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | व्यापारी शेतक-याच्या मालाची नासधूस करीत. | ६९ | ८८.४६ |
| ब. | चांगला माल नसे. | ०० | ००.०० |
| क. | लवकर विक्री होत नसे. | १८ | २३.०७ |

[टिप- काही प्रतिसादकांनी एकपेक्षा जास्त वर्णाक्षरावर खुणा केलेल्या आहेत]

शेतक-याचा माल चांगलाच असे. कारण माल चांगला नसे यास [००%] प्रतिसाद मिळाला आहे. व्यापारी मालाची नासधूस करीत असत. [८८.४६%] ही महत्वाची बाब मामांना जाणवली होती. शेतक-यांच्या मालाची लवकर विक्री होत नसे [२३.०७%]

" क" विभागातील प्रश्न दोनचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक ४. २७

शेतक-याची नाकेदाराकडून अडवणूक व त्यावरील उपाय.

| वर्णाक्षर | मामांनी केलेला उपाय | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | पैसे मागून अडवणूक केल्यास प्रतिकार करण्यास सांगितले | ७१ | ९१.०२ |
| ब. | कमी पैसे देण्यास सांगितले | ०४ | ५.१२ |
| क. | नाकेदार व रामोशी यांची समजूत घालत राहिले. | ०६ | ७.६ |

शेतक-यांची अडवणूक झाल्यास मामांनी रामोशी व नाकेदारास सरळ प्रतिकारच करण्यास सांगितले [९१.०२%]. नाकेदार रामोशी यांची समजूत घालणे यास अल्प प्रतिसाद [७.६%] मिळाला.

शेतक-यांच्या कोणत्या अडचणी मामासाहेबांना जाणवल्या या बाबत "क" विभागात प्रश्न तिसरा होता. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४. २८

शेतक-यासमोरील अडचणी.

| अ. नं. | शेतक-यासमोरील अडचणी | महत्वाक्रमानुसार क्रमांक | | | | एकूण. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | |
| १. | पुरेसे भांडवल नाही. | ३५ | ३४ | ०६ | ०३ | ७८ |
| २. | नवीन शेती विषयक ज्ञान नाही. | ३३ | २४ | १० | ११ | ७८ |
| ३. | खात्रीशीर बी.-बियाणे नाही. | ०२ | १३ | ४८ | १५ | ७८ |
| ४. | पुरेशी जमीन नाही | ०८ | ०७ | १४ | ४९ | ७८ |
| | | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ३१२ |

<u>आकडेमोड -</u>

या प्रश्नात महत्वांशानुसार क्रमांक द्यावयाचे असल्याने प्रथम गुण निश्चित करून घ्यावे लागतील.

प्रथम क्रमांक = ४ गुण.

द्वितीय क्रमांक= ३ गुण.

तृतीय क्रमांक = २ गुण.

चौथा क्रमांक = १ गुण.

एकूण प्रतिसाद संख्या ७८ असल्याने एकूण गुण -

७८x४ + ७८x३ + ७८x२ + ७८x१

= ७८ [ ४ + ३ + २ + १ ]

= ७८ [१०]

= ७८०

१] " पुरेसे भांडवल नाही" या उत्तराचे एकूण गुण काढू.

= ३५x४ + ३४x३ + ६x२ + ३x१

= १४० + १०२ + १२ + ३

= २५७

२] " नवीन शेती विषयक ज्ञान नाही " या उत्तराचे एकूण गुण व त्यावरून शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ३३x४ + २४x३ + १०x२ + ११

= १३२ + ७२ + २० + ११

= २३५

शे. गुण = $\frac{२३५}{७८०} \times \frac{१००}{१}$ = ३०.१३%

३] " खात्रीशीर बी-बियाणे नाही" या उत्तराचे एकूण गुण व शे. गुण काढू.

एकूण गुण = २x४ + १३x३ + ४८x२ + १५x१

= ८ + ३९ + ९६ + १५

= १५८

शे. गुण = $\frac{१५८}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २०.२५%

४] "पुरेशी जमीन नाही" या उत्तराचे एकूण गुण व शेकडा गुण काढू.

एकूण गुण = ८x४ + ७x३ + १४x२ + ४९x१

= ३२ + २१ + २८ + ४९

= १३०

शेकडा = $\frac{१३०}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १६.६७

शेतक-यासमोर जमिनीचा प्रश्न नव्हता [१६.६७%]

शेतक-याजवळ भांडवल उपलब्ध नव्हते [३२.९५%]

तसेच शेतीविषयक नवीन ज्ञान [३०.१३] व खात्रीशीर बी-बियाणांची उपलब्धता नव्हती [२०.१५] असे कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांना दिसून आले होते.

याच विभागात शेतक-यांना योग्य व्याज दराने कर्ज मिळावे म्हणून कर्मवीर मामांनी कोणते प्रयत्न केले असा प्रश्न होता.

कोष्टक क्रमांक४.२९

शेतक-यांना कर्ज मिळावे म्हणून केलेले प्रयत्न.

| वर्णाक्षर | प्रयत्न | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | स्वत: पैसे दिले | ०० | ०० |
| ब. | पत संस्था काढल्या | ६७ | ८५.८९ |
| क. | शेतक-यांना कर्ज देण्यासाठी देणग्या जमा केल्या. | १९ | २४.३५ |

[ टिप- काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अधिक वर्णाक्षरावर खुणा केलेल्या आहेत.]

कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी स्वत:शेतक-यांना पैसे दिले नाहीत [००%] पत संख्या काढल्या [८५.८९%] व योग्य व्याज दराने शेतक-यांना भांडवला उपलब्ध करून दिले. शेतक-यांना कर्ज देण्यासाठी देणग्या जमा केल्या नाहीत [ २४.३५%]

याच विभागात शेतक-यांना शेती विषयक नवीन ज्ञान व सुधारीत बी.-बियाणे मिळावीत म्हणून कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी कोणते प्रयत्न केले या विषयी प्रश्न पाचवा होता. त्याचे पृथ:करण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक४-३०

शेतक-यांना शेती विषयक नवीन ज्ञान मिळण्यासाठी व सुधारीत बि-बीयाणे मिळण्यासाठी केलेले प्रयत्न.

| अ. नं. | प्रयत्न | महत्वांशानुसार क्रमांक | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | १ | २ | ३ | ४ | अनुत्तरित | एकूण. |
| १. | स्वत: बी.-बियाणांची निर्मिती करून रास्त भावाने शेतक-यास दिले. | ३१ | ०८ | १४ | १३ | १२ | ७८ |
| २. | शेतकरी मेळावे भरविले व तज्ञांकडून मार्गदर्शन दिले. | ०१ | २४ | १७ | २२ | १४ | ७८ |
| ३. | रोपांची निर्मिती केली. | २२ | १९ | २३ | ०४ | १० | ७८ |
| ४. | शेती -शिक्षकांना मार्गदर्शन करण्यास लावले. | १४ | १७ | १२ | २४ | ११ | ७८ |
| | | ७८ | ७८ | ७८ | ७८ | ४७ | ३१२ |

आकडे मोड –

या प्रश्नात महत्वांशानुसार १ ते ४ क्रमांक द्यावयाचे आहेत. प्रथम खालील प्रमाणे गुण निश्चित करू.

प्रथम क्रमांक = ४ गुण.
द्वितीय क्रमांक= ३ गुण.
तृतीय क्रमांक = २ गुण.
चौथा क्रमांक = १ गुण.

एकूण प्रतिसाद संख्या ७८ असल्याने एकूण गुण.

= ७८×४ + ७८×३ + ७८×२ + ७८×१
= ७८ [ ४ + ३ + २ + १ ]
= ७८×१०
= ७८०

१] " स्वत: बि-बीयाणांची निर्मिती करून [illegible] रास्त भावाने शेतक-यास दिले" या उत्तराचे एकूण गुण काढू.

गुण = ३१×४ + ८×३ + १४×२ + १३×१
= १२४ + २४ + २८ + १३
= १८९

शे. गुण = $\frac{१८९}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २४.२३%

२] " शेतकरी मेळावे भरवले व तज्ञांकडून मार्गदर्शन दिले" या उत्तराचे एकूण गुण काढू.

= १×४ + २४×३ + १७×२ + २२
= ४ + ७२ + ३४ + २२
= १३२

शे. गुण = $\frac{१३२}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १६.९२%

३] रोपांची निर्मिती केली या उत्तराचे एकूण गुण काढू.

= २२x४ + १९x३ + २३x२ + ४x१

= ८८ + ५७ + ४६ + ४

= १९५

शे. गुण काढू = $\frac{१९५}{७८०} \times \frac{१००}{१}$ = २५.००%

४] " शेती शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात लावले " या उत्तराचे एकूण गुण काढू.

= १४x४ + १७x३ + १२x२ + २४x१

= ५६ + ५१ + २४ + २४

= १५५

शे. गुण = $\frac{१५५}{७८०} \times \frac{१००}{१}$ = १९.८७%

शेतक-यांना शेती विषयक ज्ञान मिळण्यासाठी व खात्रीशिर बी.-बियाणे उपलब्ध करुन देण्यासाठी मामांनी खालील चार प्रयत्न केलेले आहेत.

१] स्वत: वसतिगृहात रोपांची निर्मिती केली [२५.००%] व रोपे शेतक-यांना रास्त भावात विकली.

२] स्वत: बी-बियाणांचीही निर्मिती केली [२४.२३ %]

३] विद्यालयातील शेती शिक्षकांना शेतक-याचे मेळावे भरवून मार्गदर्शन करण्यात सांगितले [ १३.९७%]

४] शेतक-यांचे मेळावे भरवून तज्ञांची व्याख्याने आयोजित केली.

म ] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी व्यवसाय.

आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांनी कोणते प्रयत्न केले ? याविषयी माहिती मिळविण्यासाठी या विभागात चार प्रश्न आहेत. प्रश्न एकचे पृथःकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक५३१

आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी प्रयत्न.

| वर्णाक्षर | प्रयत्न | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | मोठ्या सुट्टीत विद्यार्थ्यांना काम दिले | ६० | ७६.९ |
| ब. | शिकत असतानाच काम करून पैसे मिळविण्याची सोय केली. | ६३ | ८०.८ |
| क. | मुलांच्या आई, वडील, किंवा भाऊ यांना काम दिले. | ७० | ८९.७ |
| ड. | त्यांना मोफत जेवण दिले. | २७ | ३४.६ |

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांसाठी मोफत जेवण सहसा दिले नाही [३४.६%] मोठ्या सुट्टीत म्हणजे उन्हाळ्याच्या व दिपवाळीच्या सुट्टीत विद्यार्थ्यांना विविध प्रकारची कामे उपलब्ध करून दिली. [७६.९%] व त्याचवेळी त्यांची वसतिगृहात जेवणाची सोय केली. मुलांच्या आईस, वडिलास किंवा भावास काम दिले [८९.७%]. विद्यार्थी शिकत असतानाही काम करून पैसे मिळविता येईल अशी व्यवस्था केली [८०.८%]. विद्यार्थ्यांच्या अर्थार्जनासाठी कर्मवीर डॉ. मामांनी कोणकोणते व्यवसाय सुरु केले या बाबत माहिती मिळविण्यासाठी प्रश्न दुसरा होता. त्याचे पृथःकरण खालील प्रमाणे.

कोष्टक क्रमांक -४.३२

विद्यार्थ्यांच्या अर्थार्जनासाठी सुरू केलेले व्यवसाय.

| वर्णाक्षर | व्यवसाय | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | कुक्कुटपालन | ७० | ८९.७ |
| ब. | दुग्ध व्यवसाय | ७१ | ९१.१ |
| क. | छापखाना | ७० | ८९.७ |
| ड. | आडत दुकान | ६९ | ८८.४६ |
| इ. | बुक डेपो | १० | १२.८२ |
| ई. | वीट भट्टी | ५१ | ६५.४ |

विद्यार्थ्यांच्या अर्थार्जनासाठी कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी विविध व्यवसाय सुरू केले.

दुग्ध व्यवसाय [९१.१%], छापखाना [ ८९.७%],कुक्कुटपालन [८९.७%], आडत दुकान [ ८८.४६%] वीट भट्टी [६५.४%] , बुक डेपो [१२.८२%].

वसतिगृहात विद्यार्थी घेताना फी व ज्वारी घेण्याच्या बाबतीत मामासाहेब कोणते निकष लावीत याबाबतची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न तीसरा होता. त्याचे पृथ:करण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्र४.३३.

विद्यार्थ्यांकडून फी व ज्वारी घेताना वसतिगृहातील निकष.

| वर्णाक्षर | निकष | प्रतिसाद | शे. प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | सर्वांना समान फी समान ज्वारी | १८ | २३.१ |
| ब. | हुषार विद्यार्थ्यांना सवलत | ०६ | ७.७ |
| क. | आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना सवलत. | ६३ | ८०.८ |

[ टिप :- काही प्रतिसादकांनी एकापेक्षा अनेक वर्णाक्षरावर खुणा केलेल्या आहेत]

के. कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे वसतिगृहात विद्यार्थी घेताना आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांना सवलत देत असत [ ८०.८%]. हुषार विद्यार्थ्यांना सवलत नसे [ ७.७%]. सर्वांना समान फी व ज्वारी असे. [२३.१%] केवळ विद्यार्थी हुषार आहे म्हणून त्यास सवलत नसे.

कमवत कमवत शिकलेल्या क.मामांच्या काही विद्यार्थ्यांची नांवे उपलब्ध व्हावीत व त्या व्यक्ती सध्या काय करीत आहेत. याबद्दल माहिती मिळविण्यासाठी प्रश्न चौथा विचारला होता. एकूण ५० विद्यार्थ्यांची नांवे उपलब्ध झाली. सेवकापासून ते प्राचार्य पर्यंत हे विद्यार्थी पोहचलेले दिसतात. सरकारी नोकरीत देखील डायरेकटरच्या पदापर्यंत गेलेले विद्यार्थी दिसतात. प्रा.जी. ई. जाधव सध्या शिवाजी महाविद्यालयात हिन्दीचे प्राध्यापक आहे. श्री. चकोर हे शेतकी खात्यात वरीष्ठ अधिकारी झाले होते. श्री. क्षिरसागर हे कृषि विद्यापीठ राहुरी येथे रजिष्ट्रार होते.

म] कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या बाबत विविध समाज घटकातील प्रतिक्रया.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विषयी सर्वांची भावना काय होती? व इतर माहिती मिळविण्यासाठी या विभागात सहा प्रश्न विचारले होते. अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी मामासाहेब कोणते प्रयत्न करीत याबाबत प्रश्न पहिला होता. त्यांचे पृथ:करण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक - ४.३४

अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहातील प्रयत्न.

| वर्णाक्षर | प्रयत्न | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| अ. | जादा तास | ३९ | ५०.०० |
| ब. | शिकवण्या | ०० | ०० |
| क. | हुषार विद्यार्थ्यांनी अभ्यासात मागे असलेल्यांना शिकवावे. | ५३ | ६७.९४ |

वसतिगृहातील विद्यार्थी अभ्यासात मागे असतील तर मामासाहेब शिक्षकांना जादा तास घेण्यास सांगत [ ५०.००%]. हुषार विद्यार्थ्यांनी अभ्यासात मागे असलेल्या विद्यार्थ्यांना शिकवावे [ ६७.९४ टक्के] असेही मामासाहेब सांगत. शिक्षकांनी शिकवण्या घ्याव्यात हे कर्मवीर मामासाहेबांना मान्य नव्हते [ ००%].

विविध समाज घटकात मामांबद्दल काय भावना होत्या ते हे जाणून घेण्यासाठी "म" विभागात प्रश्न दुसरा विचारला होता. त्याचे पृथःकरण खालीलप्रमाणे.

कोष्टक क्रमांक ४.३५

विविध समाज घटकात मामांविषयी भावना.

| प्रतिसादकाचे स्वरूप | खेडूत जनता | शहरी जनता | सुशिक्षित समाज | विद्यापीठ वर्तूळ | सरकार दरबार |
|---|---|---|---|---|---|
| आदरभाव | ३० [३८.५] | ०६ [७.७] | ०८ [१०.२५] | ०२ [२.५६] | १४ [१७.९४] |
| अवहेलना | ०० [००] | ०२ [२.५६] | ०२ [२.५६] | ०० [००] | ०० [००] |
| मुक्तीदाता | ७ [८.९] | ०० [००] | ०० [००] | ०० [००] | ०२ [२.५६] |
| उध्दारकर्ता | ३७ [४७.४] | ०२ [२.५६] | ०४ [५.१२] | ०१ [१.२८] | ०४ [५.१२] |
| समाजसुधारक | ०८ [१०.३] | १९ [२४.३५] | १० १२.८२] | ०६ [७.६] | ३८ [४८.७१] |
| क्रांतीकारक | ०० [००] | २५ [३२.१] | ०८ [१०.२५] | ०३ [३.८] | १० [१२.८२] |
| शिक्षणतज्ञ | ०१ [१.२८] | २८ [३५.९] | ११ [१४.२३] | ५४ [६९.९२] | २८ [३५.९] |
| व्यवहारवादी | ०० [००] | ०८ १०.२५] | ०३ [३.८] | ०३ [३.८] | ०४ [५.१२] |
| शिक्षण प्रसारक | ११ [१४.१०] | १९ [२४.३५] | ३६ [४६.१५] | १६ [२०.५] | १२ [१५.३८] |

[ टिप - कंसातील आकडे शेकडा प्रतिसादाचे आहेत. ]

विविध समाज घटकात कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांच्या विषयी विविध भावना होत्या [ पहा कोष्टक क्र.४.३५] खेडूत जनतेत आदरभाव दिसून आला [ ३८.५%], खेडूत जनतेला मामासाहेब आपले उध्दारकर्तेच वाटत. [४७.४%], शहरी जनतेत मामासाहेब एक क्रांतीकारक अशी भावना आहे. [३२.१%], तसेच शहरी जनता मामांना शिक्षण तज्ञ मानते [३५.९%], सुशिक्षित समाजात मामा शिक्षण प्रसारक होते, अशीच भावना आहे [४६.१५%], विद्यापीठ वर्तुळात मामा एक शिक्षणतज्ञ होते अशी भावना आहे [६९.९२%], तसेच विद्यापीठ वर्तुळात मामा शिक्षण प्रसारक अशीही भावना आहे [२०.५%], सरकार दरबारी मामा एक शिक्षण प्रसारक [१५.३८%], शिक्षणतज्ञ [३५.९%] व समाज सुधारक [ ४८.७१%] अशी भावना आहे.

खेडूत जनतेला मामा उध्दारकर्ते वाटतात [४०.४%], शहरी जनतेला मामा शिक्षण तज्ञ वाटतात [३५.९%], सुशिक्षित समाजात मामा शिक्षण प्रसारक होते. अशीच भावना आहे. विद्यापीठ वर्तुळात मामांना शिक्षणतज्ञ समजतात [६९.९२], अभ्यासकास ही प्रतिक्रीया अत्यंत महत्वाची वाटते. मामासाहेब समाज सुधारक होते, अशी सरकार दरबारी भावना आहे. [४८.७१%].

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे विद्यार्थ्यांना शिक्षा करीत असत याबाबत मत आजमविण्यासाठी याच विभागात प्रश्न तिसरा विचारला होता.

कोष्टक क्रमांक ४.३६
शिक्षा योग्य की अयोग्य

| क्रमांक: | मत | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | शिक्षा करणे योग्यच होते. | ६७ | ८५.९ |
| २. | शिक्षा करणे अयोग्य होते. | ०० | |
| ३. | अनुत्तरित | ११ | १४.१ |

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे हे विद्यार्थ्यांना जबर शारीरिक शिक्षा करीत असत अशा प्रकारची शिक्षा करणे योग्यच होते [ ८५.९%]. शिक्षा करणे अयोग्य होते असा प्रतिसाद [००%] मिळालाच नाही.

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आपणाला आवडत असत किंवा नसत याबाबत प्रश्न चौथा व पाचवा विचारला होता. तसेच आवडणे व न आवडणे याबद्दलची कारणेही विचारली होती. या प्रश्नाचे पृथ:करण खालील प्रमाणे

कोष्टक क्रमांक ५.३७

कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे आवडत असत किंवा नसत.

| अ.नं. | मत | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | आवडत असत | ६८ | ८७.१७ |
| २. | आवडत नसत | १६ | २०.५१ |
| ३. | अनुत्तरित | १० | १२.८२ |

[टीप- काही प्रतिसादकांनी दोन्हीही प्रकारची मते नोंदविली आहेत]

मामा सर्वांना आवडत असत [८७.१७%]. मामा आवडत नसत [२०.५१%]. मामा आपणाला का आवडत असत या प्रश्नाचे उत्तरात खालील मुद्दे आलेले आहेत.

१] गरीबा विषयी तळमळ

२] निर्भिड बोलणे.

३] दलितांना समान वागणूक

४] विद्यार्थ्यांवर माया असे.

५] मुलींचे शिक्षण घेताना येणा-या अडचणी सोडविल्या.

६] साधी राहणी.

७] श्रमप्रतिष्ठा वाढवली.

८] शिस्त व चारित्र्य

९] त्याग

१०] बहुजन समाजाच्या उध्दारासाठी निस्वार्थी धडपड.

११] दांभिकतेचा राग.

१२] मुलांचेच जेवण स्वत: घेत.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे का आवडत नसत याबद्दल ही शेकडा २०.५१ प्रतिसादकांची मते आहे. त्यांच्या उत्तरात खालील मुद्दे आहेत.

१] शिक्षा कठोर असे.

२] बोलणेही कठोर असे.

याच विभागातील प्रश्न सहावा आठवणीबाबत होता. या आठवणींच्या सहाय्याने अभ्यासकास मामांचे खालील गुण दिसून आले.

१] चिकाटी.

२] मुलांबद्दल प्रेम.

३] काटकसर.

४] साधा आहार.

५] अंधश्रध्देवर प्रहार करण्याची वृत्ती.

## ४.३. मुलाखतीच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थनिर्वचन -

अभ्यासकाने एकूण २० व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या आहेत. मामांच्या निकट सहवासात असलेल्या व्यक्तींची मुलाखतीसाठी निवड केलेली होती. त्यांचे वर्गिकरण खालील प्रमाणे.

१] श्री शिवाजी शिक्षण मंडळ बार्शी या संस्थेचे = ०५
सदस्य.

| | | | |
|---|---|---|---|
| २] | प्राचार्य | = | ०३ |
| ३] | प्राध्यापक | = | ०४ |
| ४] | मुख्याध्यापक | = | ०२ |
| ५] | शिक्षक | = | ०४ |
| ६] | सर्वसामान्य नागरिक | = | ०२ |

[ व्यक्तींची यादी परिशिष्ट- ५ मध्ये दिली आहे. ]
अभ्यासकाने मुलाखत अनुसूची तयार केली होती.
[मुलाखत अनुसूची परिशिष्ट-३ मध्ये दिली आहे ] मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने विचारलेल्या प्रश्नाचे पृथ:करण व अर्थ निर्वचन खालील प्रमाणे.

अ] कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे यांची राहणी व व्यक्तीगत जीवन-

कर्मवीर डॉ. मामासाहेबांची राहणी अत्यंत साधी होती असा शेकडा ९० इतका प्रतिसाद मिळाला. कागदाच्या पाठको-या भागावर ते लिहीण्यास सांगत. गरीबा विषयी त्यांना तळमळ होती. ते थंड पाण्याने अंघोळ करीत. स्वत:चे कपडे स्वत: धूत [ अर्धांग वायू झाल्यानंतर बंद झाले ] पायात अधू झाल्यानंतरही बादली व कपडे नळावर स्वत: नेत असत.

कर्मवीरांनी स्वत: व्यक्तीगत जीवनात फार मोठा त्याग केला होता. असा प्रतिसाद शेकडा १०० मिळाला. कर्मवीर मामांनी सर्व भौतिक सुखाचा त्याग केला होता. त्याग हेच मामांचे मुख्य बळ होते असे प्राचार्य सी. एस. मोरे यांनी सांगितले.

ब] स्त्रियांचे शिक्षण -

" जिजाबाईने शिक्षण दिले म्हणून शिवाजी महाराज तयार झाले "

असे मामासाहेब म्हणत असत. मुलापेक्षाही मुलींच्या शिक्षणास मामासाहेब अधिक महत्त्व देत असत असा शेकडा ८० प्रतिसाद मिळाला आहे. मुलींची राहण्याजेवणाची गैरसोय व पालकांचा मुलींच्या शिक्षणाविषयीचा दृष्टीकोन या मुलींच्या शिक्षणातील अडचणी मामांना जाणवल्या होत्या असा शेकडा ९० प्रतिसाद मिळाला. या अडचणी निवारणा करण्यासाठी मामांनी मुलींसाठी बार्शीत" भारतीय बालिकाश्रम " हे वसतिगृह १९४७ साली सुरु केले. कर्मवीर मामांनी पालकांचे मुलींच्या शिक्षणाबाबत मत परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. याबाबत शेकडा ६० प्रतिसाद मिळाला.

स्त्रियांनी सर्वच क्षेत्रात पुरुषांप्रमाणे काम करावे असे मामांचे मत होते. असा शेकडा ७५ प्रतिसाद मिळाला. स्त्रियांना मुख्याध्यापिका म्हणून काम करण्याची संधी दिली. डॉ. कुन्ता जगदाळे यांनी तडवळे येथे मुख्याध्यापिका म्हणून काम केले. सौ. शैलजा शितोळे यांनी बार्शी विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढवली व विजयी झाल्या त्यावेळी मामांनी त्यांना प्रोत्साहन दिले होते.

क] <u>विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी केलेले प्रयत्न -</u>

विधवा, विधुर व परित्यक्ता यांच्या बाबत मामांना सहानुभूती होती. विधवा परित्यक्ता यांना वसतिगृहात स्वयंपाक करण्याचे काम दिले. व विधुरांना शेतीवरील काम दिले. असे मत ९५ टक्के प्रतिसादकांनी दिले. त्यांच्या मुलांची वसतिगृहात राहण्या जेवणाची व्यवस्था केली व शिक्षण देण्याची व्यवस्था केली. त्यांच्याबद्दल सहानुभूती असली तरी त्यांना मोफत जेवण दिले नाही. मामांना ऐतखाऊ जात निर्माण करावयाची नव्हती असे प्राचार्य डॉ. सी. बी. शितोळे यांनी सांगितले.

विधवा विवाह व्हावेत असे मामांचे मत होते असा शेकडा ५० प्रतिसाद मिळाला. उपलब्ध माहितनुसार मामांनी १२ विधवा विवाहांना मदत केली आहे.

विधवा , विधुर व परित्यक्ता यांना मामांनी आधार दिला. त्यांना काम दिले. व त्यांना मानाने जगण्याचा मार्ग दाखविला श्री. शिवाजी बोर्डिंग येथील रेकॉर्ड वरून विधवा ६५, विधुर ५ व परित्यक्ता १५ अशी संख्या उपलब्ध आहे.

श्रीमती हौसाबाई महादेव मुंढे या विधवा होत्या. त्यांना एक मुलगा व एक मुलगी होती. श्रीमती हौसाबाई मुंढे वसतिगृहात स्वयपांक करीत असत. मामांनी त्यांच्या मुलांची शिक्षणाची सोय केली. आज त्यांचा मुलगा श्री. हनुमंत महादेव मुंढे शिक्षक आहे. तर मुलगी सौ. विजया महादेव मुंढे शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापिका म्हणून काम करीत आहेत.

ड) वर्णव्यवस्था व अंधश्रध्दा -

वर्ण व्यवस्था नसावी असेच मामांचे मत होते. असा शेकडा १०० प्रतिसाद मिळाला. अंधश्रध्दा व अनिष्ठ रूढी बाबत मामासाहेब भाषणातून प्रहार करीत असत. संस्थेचे खजिनदार श्री. श्रीरंग खंडेराव खेडकर यांनी एक आठवण सांगितली त्यातून मामांचा अनिष्ठ रूढी बाबतचा दृष्टीकोन लक्षात येतो.

" येडशी येथे दगड फोडण्याचे काम चालू होते. वडरांच्या काही स्त्रिया काम करीत होत्या त्यांच्या अंगात चोळ्या नव्हत्या. हे मामांनी पाहिले. तेथील शिक्षक श्री. रा. ज. पवार यांना मामांनी चोळ्याचे खण आणावयास पाठवले. त्या बायकांना नंतर चोळ्या घालण्यास सांगितले. चोळ्या घालणे त्यांच्या रूढीच्या परंपरेच्या विरूध्द होते. त्यांच्या जात बंधूनी त्यांना वाळीत टाकले. नंतर काही दिवसांनी त्यांच्या घरात पुध्दापकाळाने एकाचा मृत्यू झाला. मृताचा अत्यंविधी करण्यासाठी त्यांच्या जातीतील कोणीच मदत करेना. मामांना हे समजले मामांनी वसतिगृहातील मुलांच्या मदतीने अत्यंविधी पार पाडला.

वर्ण व्यवस्था , अंधश्रध्दा व अनिष्ठ रूढी बाबत मामांनी केलेले विविध प्रयत्न प्रतिसादकांनी खालील प्रमाणे सांगितले.

१] वसतिगृहात सर्व जाती जमातीच्या स्त्रिया स्वयपाक करण्यासाठी होत्या [ शेकडा ८५ प्रतिसाद ]

२] वसतिगृहात सर्व जाती जमातीच्या मुलांना प्रवेश होता [ शेकडा १०० प्रतिसाद ]

३] वसतिगृहातील वाढपी मुले सर्व जाती जमातीतील असत [ शेकडा १०० प्रतिसाद ]

४] विवाह कमी खर्चात लावले [ शेकडा ७५ ]

५] पूजा अर्चा यावरील खर्च कमी करण्यास सांगितले [शेकडा ७० प्रतिसाद]

६] हुंडा बंदीच्या शपथा घेण्यास लावले [ शेकडा ८० प्रतिसाद ]

कर्मवीर युवक मंडळाच्या रेकॉर्डवरून कमी खर्चात लावलेले विवाह एकूण ४० तर हुंडाबंदीच्या शपथा एकूण १६५ युवकाने घेतल्या आहेत.

ड] वसतिगृहातील आहार व व्यायाम-

वसतिगृहातील आहार साधा व पौष्टिक असावा असेच मामा-साहेबांचे मत होते. या बाबत मुलाखतीत शेकडा १०० प्रतिसाद मिळाला. वसतिगृहातील सर्वच मुलांनी व्यायाम केला पाहिजे असे मामांचे मत होते. धारणे हा व्यायाम सर्वांनी घ्यावा अशी वसतिगृहात योजना होती. व्यायामाबाबत वसतिगृहात सक्ती होती. [शेकडा १०० प्रतिसाद ]

शरीर निरोगी व पिळदार असणे मामांना आवडे प्राचार्य व. न. शिंगळे यांनी मुलाखतीत मामासाहेब नेहमी म्हणत असलेली खालील वाक्ये सांगितली.

१] कॉलर ताठ पण आत सगळा नेमळट मामला.

२] चार चार पदव्या हाता पायाच्या काड्या.

३] अंगात रग असेल तर रग [ उबदार पांघरुण ] देण्याची गरज नाही.

ई] नेतृत्व गुण व श्रम निष्ठा -

मुलामध्ये समाधीटपणा, नेतृत्व गुण व श्रमाबद्दल आवड निर्माण झाली पाहिजे असा मामासाहेबांचा आग्रह होता असा शेकडा १०० प्रतिसाद मिळाला. वसतिगृहात मामांनी खालील उपाय योजले होते. खालील तक्त्यात उपाय व मुलाखतीतून मिळालेला शेकडा प्रतिसाद दिला आहे.

कोष्टक क्र. ४.३८

समाधीटपणा, नेतृत्व व श्रमनिष्ठा हे गुण वाढावेत म्हणून वसतिगृहात योजलेले, उपाय.

| अ.नं. | उपाय | प्रतिसाद | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | वसतिगृहातील सर्वच कामे विद्यार्थी करीत असत. | १६ | ८० |
| २. | विद्यार्थ्यांना उन्हाळ्याच्या सुट्टीत काम देवून आर्थिक मोबदला दिला जाई. | १३ | ६५ |
| ३. | विहिरी विद्यार्थ्यांच्या मदतीने फोडल्या. | १८ | ९० |
| ४. | वसतिगृहात मुलांचे मंत्रिमंडळ असे. | १९ | ९५ |
| ५. | श्रम प्रतिष्ठेवर व्याख्याने दिली. | १४ | ७० |
| ६. | मजूर व गवंड्याचा मंत्र्याच्या हस्ते सत्कार केला. | १९ | ९५ |

" दोन बोटांनी काम करणा-यापेक्षा दहा बोटांनी काम करणा-यांची प्रतिष्ठा वाढली पाहिजे " असे मामासाहेब नेहमी म्हणत [ प्राचार्य] व . न. अिंगळे यांच्या मुलाखतीतून.

ए] शेतक-यामध्ये जागृती -

व्यापारी शेतक-यांच्या मालांची नासधूस करीत म्हणून मामांनी संस्थेमार्फत आडत दुकान सुरु केले. असा शेकडा ८० प्रतिसाद मिळाला. ज्वारी, कडबा, जनावरे विक्री करतांना दलाल शेतक-यावर अन्याय करीत त्यांच्या विरुध्द शेतक-यात जागृती करुन त्यांच्यावरील अन्याय दूर केला असा शेकडा ८५ प्रतिसाद मिळाला. शेतक-यांना रास्त व्याज दराने कर्ज मिळावे म्हणून मामांनी पत संस्था सुरु केल्या.

शेतक-यांना खात्रीशीर बी. बियाणे रास्त भावात मिळावे म्हणून वसतिगृहातील शेतात बी बियार्णांची निर्मिती केली. [ मिरची, कांदे, ज्वारी बटाटा, वांगी ]
हे बी- बियाणे रास्त भावात शेतक-यांना विकण्याची व्यवस्था केली याबाबतचा शेकडा १०० प्रतिसाद मिळाला.

फ] आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय-

" ज्याच्या जवळ शरीर आहे. त्याची काम करण्याची व शिकण्याची इच्छा आहे. अशा विद्यार्थ्यांची शिक्षणाची व्यवस्था झाली पाहिजे ". [ प्राचार्य डॉ. चर्तुभुज बंकट शितोळे यांच्या मुलाखतीतून ]

आर्थिक दृष्टया मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी मामांनी खालील विविध व्यवसायात काम उपलब्ध करुन दिले व कामाचा मोबदला देवून त्यांची शिक्षणाची सोय केली. [ शेकडा १०० प्रतिसाद ]

१] कुक्कुट पालन.

२] दुग्ध व्यवसाय.

३] छापखाना.

४] वीट भट्टी.

५] आडत दुकान.

६] केस कापणे.

७] बुक डेपो.

८] इमारतीसाठी पाया खोदणे.

९] शेतीतील कामे.

मामासाहेब वसतिगृहातील सर्वांना समान फी व ज्वारी घेत नसत. आर्थिक स्थितीवरुन फी ठरवत असत. मामांनी मोफत जेवण कोणालाही दिले नाही. काम देवून मोबदला दिला. मोफत मिळाले तर त्याला श्रम करावे असे वाटणार नाही असे मामांचे मत होते. असा शेकडा ९० प्रतिसाद मिळाला.

भ ] मामांना श्रम करणारे विद्यार्थी आवडत हुषार विद्यार्थ्यापेक्षा समाजसेवा करणारा श्रेष्ठ असे मामा मानीत यास ५० टक्के प्रतिसाद मिळाला. श्री. श्रीरंग खंडेराव रेवडकर व श्री. अंबादास कृष्णात पाटील यांनी उच्च शिक्षण घेतले नाही. पण त्यांना समाज कार्याची आवड होती. मामांनी त्यांना जवळ केले. त्याच्यांवर खजिनदार व जॉ. सेक्रेटरी अशी कामे सोपवली. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कार्यात या दोघांचा अत्यंत महत्वाचा वाटा आहे.

म ] विविध समाज घटकांत यांच्याबद्दल [ मामांच्याबद्दल ] काय भावना होती असा प्रश्न अभ्यासकाने विचारल्यानंतर खालील प्रमाणे प्रतिसाद दिसून आले.

कोष्टक क्रमांक- ४.३९

कर्मवीर मामासाहेबांच्याबद्दल विविध समाज घटकांत असलेल्या भावना.

| अ.नं. | समाज घटक | भावना | शेकडा प्रतिसाद |
|---|---|---|---|
| १. | खेडूत जनता | उध्दारकर्ता | ८० |
| २. | शहरी जनता | शिक्षण तज्ञ | ७० |
| ३. | सुशिक्षित समाज | शिक्षण प्रसारक | ८० |
| ४. | विद्यापीठवर्तूळ | शिक्षण तज्ञ | ९० |
| ५. | सरकार दरबार | समाज सुधारक | ८० |

खेडूत जनतेला मामासाहेब उध्दारकर्ते वाटत [शेकडा-८० ] शहरी जनतेला मामासाहेब शिक्षणतज्ञ वाटत [शेकडा ७०] सुशिक्षित समाजात मामासाहेब शिक्षण प्रसारक होते अशी भावना आहे [शेकडा ८० ] विद्यापीठ वर्तूळात मामांना शिक्षण तज्ञ समजत असत [ शेकडा -९० ] सरकार दरबारी मामा समाजसुधारक होते अशी भावना आहे.

४.४ कर्मवीर डॉ. मामासाहेबांनी सुरु केलेल्या विविध संस्थांना भेटी देवून अभ्यासकाने केलेले अर्थनिर्वचन.

कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांनी " श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी " या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचा रजिष्ट्रेशन नंबर पुढील प्रमाणे आहे.

Registered Under Societies Registration Act- XXI of 1860.

Reg.No.- 1519 of 1946-47 dated 28-1-1947

Registrered Under the Bombay Public Trusts Act XXIX of 1950.

Reg. No. F-27 dated 25-2-53.

या संस्थेच्या विविध शाखा सुरु झाल्या. वसतिगृहे, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये प्रशिक्षण विद्यालये व महाविद्यालय अशा शैक्षणिक शाखा सुरु झाल्या. छापखाना, आडत दुकान, शेती व पोल्ट्री फॉर्मस् अशा प्रकारच्या शिक्षणेत्तर शाखाही सुरु झाल्या. पहा परिशिष्ट क्रमांक -६ ] श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेच्या शाखांची वाढ कशी होत गेली हे खालील कोष्टकात दिले आहे. [ पहा आलेख क्रमांक ४.१ ]

कोष्टक क्रमांक-४.४०

श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी या संस्थेच्या शाखांत झालेली वाढ.

| अ.नं. | वर्ष | शाखांची संख्या. |
|---|---|---|
| १] | १९३४ | १ |
| २] | १९३७ | १ |
| ३] | १९४० | १ |
| ४] | १९४३ | १ |
| ५] | १९४६ | १ |
| ६] | १९४९ | २ |
| ७] | १९५२ | ५ |
| ८] | १९५५ | १२ |
| ९] | १९५८ | २० |
| १०] | १९६१ | २८ |
| ११] | १९६४ | ३२ |
| १२] | १९६७ | ३४ |
| १३] | १९७० | ३७ |
| १४] | १९७३ | ३८ |
| १५] | १९७६ | ४२ |
| १६] | १९७९ | ४२ |
| १७] | १९८२ | ४२ |
| १८] | १९८५ | ४२ |

आलेख क्रमांक ५-१ वरून व कोष्टक क्रमांक ५.४० वरून १९५२ ते १९७३ या सालात जास्त शाखा सुरु झाल्या. १९७६ पासून संस्थेची नवीन शाखा सुरु करण्या-बाबतची प्रगती थांबली आहे असे दिसते. १९३४ ते १९४६ अखेर फक्त एकच वसतिगृह होते.

शैक्षक-यात जागृती करणे, हुंडा बंदी विषयी कार्य करणे, वाचनालये सुरु करणे इ. हेतू श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळा मार्फत साध्य करतांना कांही अडचणी येऊ लागल्या म्हणून मामांनी काही वेगळ्या संस्था स्थापन केल्या [ पहा परिशिष्ट क्र- ७ ]

अभ्यासकाने माहिती मिळविण्यासाठी काही शाखांना व संस्थांना भेटी दिल्या. श्री. शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शाखांची संख्या ४३ आहे. कर्मवीर मामासाहेबांनी आणखी १० संस्था सुरु केल्या. या सर्वांना भेटी देणे प्रस्तुत संशोधनाच्या मर्यादेबाहेर असल्याने संशोधकाने खालील ठिकाणी भेटी देवून माहिती मिळवली आहे.

१] शिक्षण महाविद्यालय, बार्शी.
२] शिवाजी बोर्डिंग [वसतिगृह] बार्शी.
३] शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी.
४] जिजामाता विद्या मंदीर बार्शी.
५] कर्मवीर युवक मंडळ, बार्शी.
६] कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद.

१] <u>शिक्षण महाविद्यालय, बार्शी-</u>

महाविद्यालयात प्रवेश देतांना केवळ गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देण्यात येतो. समाज सेवा करणा-या स्त्रियांना व विद्यार्थ्यांना स्कूल कमिटीच्या अधिकारातील जागेवर प्रवेश दिला जातो. आता पर्यंत

११ स्त्रियांना व १४ विद्यार्थ्यांना अशा प्रकारे प्रवेश दिला आहे. प्रवेश देतांना कोणत्याही विद्यार्थ्यांकडून प्रवेशासाठी देणगी घेतली जात नाही. आर्थिक दृष्टया मागास विद्यार्थ्यांना काम देण्याची व्यवस्था या महाविद्यालयात केली जाते. आता पर्यंत ४० विद्यार्थ्यांना महाविद्यालयाने काम मिळवून दिले. बी.एड्. कोर्स पूर्ण करतांना या विद्यार्थ्यांना घरून एकही पैसा आणावा लागला नाही.

हुंडा न घेता लग्न करणे व आंतरजातीय विवाह करणे यासाठी प्रोत्साहन दिले जाते प्राचार्यांच्या अभिभाषणाच्या वेळी प्राचार्य डॉ.सी.बी. शितोळे खालील प्रकारे आवाहन करतात.

> " ज्याच्या जवळ पैसा नाही पण काम करण्याची इच्छा आहे. त्यांनी मला नंतर भेटावे जे मानसन्मान न घेता लग्न करणार असतील त्यांची लग्नाची जबाबदारी आम्ही घेऊ "

अशा प्रकारे कर्मवीर मामासाहेबांनी सुरु केलेले कार्य पुढे चालू ठेवण्याचा प्रयत्न या महाविद्यालयात केला जात आहे.

२] श्री शिवाजी बोर्डिंग बार्शी-

सध्या देखील विधवा व परित्यक्ता यांना वसतिगृहात काम दिले जात आहे. १९८७-८८ या शैक्षणिक वर्षात एकूण ९ स्त्रिया स्वयपाक करण्यासाठी आहेत. पैकी ५ विधवा व १ परित्यक्ता आहे. बाकीच्या ३ स्त्रिया आर्थिक दृष्टया गरीब आहेत. दुग्ध व्यवसाय चालू आहे. वसतिगृहाच्या परिसरांतील शेतीवर विद्यार्थ्यांना काम दिले जाते. वसतिगृहात १९८७-८८ या शैक्षणिक वर्षात १९० विद्यार्थी आहेत. विद्यार्थी दररोज कमीत कमी ३ कि.मी. धावण्याचा व्यायाम करतात.

धावण्याच्या व्यायामाबाबत सध्याही सक्तीच केली जाते. वसतिगृहाच्या आवारात कुस्तीसाठी आखाडे आहेत. एक उघड्यावर आखाडा आहे. त्याची मापे ५०'×३०' अशी आहेत. एक आखाडा इमारतीत आहे. त्याची मापे २०'×१५' अशी आहेत. विद्यार्थ्यांना पोहण्यासाठी चौकोणी विहिर आहे. विहिर १०० फूट लांब ६० फूट रुंद व ४० फूट खोल आहे. मुलींसाठी पोहण्यासाठी एक चिरेबंदी गोल विहीर आहे. या विहीरीचा व्यास ५० फूट आहे. व खोली ३५ फूट आहे.

वसतिगृहातील आहार साधा पण चौरस आहे. श्रम प्रतिष्ठा वाढावी म्हणून विद्यार्थ्यांकडून कामे करुन घेतली जातात. विद्यार्थ्यांच्या व्यायामाची व्यवस्था केलेली आहे. नेतृत्व गुण अंगी वाढावा म्हणून "आनंद भुवन " या सभागृहात वादविवाद व भाषणे हे कार्यक्रम आयोजित केले जातात.

३] शंकरराव निंबाळकर अध्यापक विद्यालय, बार्शी.

या विद्यालयात देखील गरीब विद्यार्थ्यांची काम देवून शिक्षणाची व्यवस्था केली जाते. या कामी " शिवाजी बोर्डिंग " या वसतिगृहाचे सहाय्य घेतले जाते.

या विद्यालयामार्फत दरवर्षी खेड्यात जावून समाजसेवा शिबीर आयोजित केले जाते. सन १९८७-८८ या वर्षात खांडवी ता. बार्शी येथे शिबीर आयोजित केले होते. शिबीर काळात विद्यार्थी खालील बाबी करतात.

१] शेतक-यात जागृती - बी- बियाणे, खत कर्ज याबाबत.
२] अनिष्ठ रुढी व परंपरा याबाबतचा प्रचार.
३] समाज सेवा- रस्ते, शाळेचे क्रिडांगण, मंदीरे स्वच्छ करणे.
४] लोकरंजनातून लोक शिक्षण- पोवाडे, गाणी, नक्कला द्वारे लोकशिक्षण.

[ उदा. दारुड्याच्या नक्कलेतून दारुचे दुष्परिणाम ]

५] समाजातील विविध अडचणींचा शोध घेण्याचा प्रयत्न केला जातो.

४] जिजामाता विद्यामंदीर -

या विद्यामंदीरात असणा-या शिक्षिका अध्यापना व्यतिरिक्त समाजसेवाही करीत आहेत. कुटुंब नियोजनाचे महत्व, बालसंगोपन, स्वच्छतेचे महत्व या बाबी अशिक्षित समाजात रुजविण्याचे कार्य शिक्षिका करीत आहेत. सन १९८७-८८ या वर्षात एकूण १३ स्त्रियांना कुटुंब नियोजन करुन घेण्याबाबत प्रवृत केले. आतापर्यंत येथील शिक्षिकांनी ६५ स्त्रियांना कुटुंब नियोजन करण्याबाबत प्रवृत्त केले आहे.

येथील ९०% शिक्षिका कर्मवीर मामांच्याच संस्थेच्या माजी विद्यार्थीनी आहेत. अध्यापनाचे कार्य उत्तम चालते. जिजामाता विद्यामंदीर ही बार्शी शहरातील एक उत्तम मुलींची प्राथमिक शाळा आहे [ पहा आलेख क्रमांक -४.२ ] विशेष बाब म्हणजे येथे प्रवेशासाठी कधीही देणगी स्विकारली जात नाही.

या प्राथमिक शाळेतील विद्यार्थीनींची वाढ दरवर्षी झालेली आहे. साल व संख्या दाखविणारा तक्ता पुढील पानावर दिला आहे.

कोष्टक क्रमांक - ४.४१

जिजामाता विद्यामंदीरातील विद्यार्थीनींची संख्या दाखविणारा तक्ता.

| अ.नं. | शैक्षणिक वर्ष | विद्यार्थीनींची संख्या |
|---|---|---|
| १] | १९६८-६९ | ९९ |
| २] | १९७०-७१ | १९३ |
| ३] | १९७२-७३ | २६९ |
| ४] | १९७४-७५ | २९५ |
| ५] | १९७६-७७ | ३३९ |
| ६] | १९७८-७९ | ३७४ |
| ७] | १९८०-८१ | ४०० |
| ८] | १९८२-८३ | ५०२ |
| ९] | १९८४-८५ | ५३६ |
| १०] | १९८६-८७ | ६१३ |

या विद्यामंदीरातील विद्यार्थीनींची संख्या सतत वाढत चालली आहे. १९८७-८८ या शै. वर्षात तेथे १५ शिक्षिका काम करीत आहेत. या शाळेतील शिक्षिका "प्राथमिक शिक्षण " या विषयाबाबत संशोधनही करीत आहेत. एम्.एड्. ही पदवी घेतलेल्या दोन शिक्षिका आहेत.

जिजामाता विद्यामंदीराच्या इमारतीतच जिजामाता स्मारक मंदीर आहे. तेथे शिवणकाम , एम्ब्रॉयडरी, घरसजावट व वस्तू तयार करणे हे व्यवसाय विधवा व परित्यक्तासाठी शिकविले जातात. १९८७-८८ वर्षात एकूण ३० स्त्रिया व्यवसाय शिक्षण घेत आहेत. आता पर्यंत एकूण ४०० स्त्रिया व्यवसाय शिकून स्वत:च्या पायावर उभ्या राहिल्या आहेत.

५] <u>कर्मवीर युवक मंडळ, बार्शी.</u>

कमी खर्चात विवाह लावणे, हुंडा घेणार नाही अशा शपथा घेण्यास सांगणे शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थी यात जास्त प्रमाणात भाग घेत आहेत. आता पर्यंत खालील कार्य या मंडळाने केलेले आहे.

कर्मवीर युवक मंडळाच्या अहवालावरुन.

१] कमी खर्चात लावलेले विवाह = ४०

२] हुंडा बंदीच्या शपथा घेतलेले = १६५
युवकश

६] कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय वाशी जि. उस्मानाबाद.

मराठवाडयातील हे महाविद्यालय आहे. वाशी हे गाव तालुका देखील नाही. हे महाविद्यालय ग्रामीण भागातील महाविद्यालय आहे. [ आलेख क्र.५.३ पहा ] कर्मवीर मामासाहेबांच्या विचारांचा प्रसार करण्याचे कार्य हे महाविद्यालय करते, प्राचार्य सी. एस्. मोरे यांनी मामांच्या जीवनावर आतापर्यंत विविध ठिकाणी ३४ व्याख्याने दिली आहेत. अल्पावधीत श्रमदानाने व मदत मिळवून १३ हॉल आहेत. महाविद्यालयास १० एकर २८ गुंठे जागा आहे. विद्यार्थ्यांनी श्रमदान करुन जमिन सपाट करुन क्रिडांगण तयार केले आहे व ५०० झाडे लावून ती जगविण्यात आली आहेत. प्रतिवर्षी कर्मवीर मामासाहेब जगदाळे आंतर महाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धा आयोजित केली जाते. १९८३ साली वृक्ष दिंडीत प्राचार्य, दोन प्राध्यापक व ५ विद्यार्थी सामील होऊन पैठणला गेले होते. महाविद्यालयात स्त्री - मुक्ती मंचाची स्थापना करण्यात आली आहे. त्याद्वारे एस.एन.डी. टी. महिला विद्यापीठाचे वर्ग चालविले जातात. सन १९८७-८८ वर्षात प्रवेश परीक्षेस १६ व बी.ए. भाग १ ला ९ महिला बसविण्यात आल्या.

महाविद्यालयात कमवा शिका योजना आहे याद्वारे सन १९८७-८८ वर्षात ७ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

हे महाविद्यालय ग्रामीण भागातील असून देखील सतत प्रगतीपथावर आहे. खालील कोष्टकांत मुलांची व मुलींची संख्या दिली आहे व त्यावरून आलेख काढला आहे.

कोष्टक क्रमांक= ४.४२

कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, बार्शी जि. उस्मानाबाद
मुले व मुली संख्या.

| अ. नं. | शैक्षणिक वर्ष | मुले | मुली |
|---|---|---|---|
| १ | १९७२-७३ | १७७ | ३० |
| २. | १९७४-७५ | ३०३ | ५४ |
| ३. | १९७६-७७ | १६७ | २६ |
| ४. | १९७८-७९ | २५३ | ३७ |
| ५. | १९८०-८१ | १८६ | ४८ |
| ६. | १९८२-८३ | ३१५ | ५४ |
| ७. | १९८४-८५ | ५१६ | ९० |

४.५ ध्वनी फितीच्या आधारे मिळविलेल्या माहितीचे पृथ:करण व अर्थ-निर्वचन-

प्राचार्य व.न. अिंगळे व प्राचार्य. सी.एस्. मोरे यांनी विविध विषयावर कर्मवीर मामासाहेबांच्या मुलाखती घेतल्या होत्या त्या मुलाखतीच्या काही ध्वनी फिती उपलब्ध आहेत. त्या ध्वनी फिती ऐकून अभ्यासकाने माहिती मिळवली आहे.

कर्मवीर मामासाहेब समाजातील ढोंगी प्रवृत्तीवर अत्यंत परखड टिका करीत असत. बुवाबाजी, देवीचा कोप व नवस बोलणे यांचा फोलपणा आपल्या खास शैलीत समाजापुढे मांडत. समाजसेवा करतो या नावाखाली ढोंग करणा-यांना मामा परखड बोलत.

यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण यांना मामाबद्दल अत्यंत आदर होता. मामांनाही त्यांच्याबद्दल अत्यंत अभिमान होता.

स्त्रिया, हरिजन, शेतकरी, कामकरी यांच्याबद्दल मामांना जिव्हाळा होता.